**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, तळेगाव (भो.), तालुका-देवणी, जि. लातूर, मेहाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन ११०.० किलोलिटर प्रतिदिन मळी (बी आणि सी हेवी) /उसाच्या रसावर आधारित आसवणी प्रकल्प व 3 मेगावॅट वीज प्रकल्प गट न 5 मौजे अचवला ता. देवणी उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावनी बाबतचा ईतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स. जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, तळेगाव (भो.), तालुका-देवणी, जिल्हा-लातूर महाराष्ट्र,यांच्या प्रस्तावित नविन ११०.० किलोलिटर प्रतिदिन मळी/(बी आणि सी हेवी) / उसाच्या रसावर आधारित आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीवर - मंगळवार, दिनांक २० जुलै,२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक१४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं.ई-४६, व्दारापत्रक्रं .बीओ /जेडी /डब्लुपीसी /पीएच /बी-२१०६२९- एफटीएस ०२३२ दिनांक २९ जून, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, लातूर
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) **-सदस्य**

३) उपप्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,लातूर **-समन्वयक**

श्री.व्यं.पा.शेळके, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी श्री.विजयकुमार ढगे, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती, डॉ. पी.एम.जोशी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती, प्रकल्प अधिकारी आणि पर्यावरण जाहीर लोकसुनावणी मध्ये सहभागी स्थानिक यांचे स्वागत करुन असे सांगितले की, कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली आणि समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीबाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्या अनुषंगाने पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे .श्री. व्यं.पा. शेळके, यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे प्रकल्प प्रवर्तक मेसर्स. जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, तळेगाव (भो), तालुका-देवणी, जिल्हा-लातूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन ११०.० किलोलिटर प्रतिदिन मळी(बी आणि सी हेवी) / उसाच्या रसावर आधारित आसवणी प्रकल्प व 3 मे. वॅट वीज प्रकल्प गट नं 5 मौजे अचवला ता. देवणी येथे उभारणी संदर्भात पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला होता. सदरहू घोषित प्रकल्प औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर असल्याने समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य

जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामानबदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक०७-०४-२०२१ रोजी त्यास मान्यता( अटी व शर्ती - Terms of Reference) देण्यात आली.

सदरहू लोकसुनावणी ही आज दिनांक २०-०७-२०२१ रोजी आयोजित करण्यास मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृतपत्र दैनिक सकाळ व वृतपत्र टाइम्स ऑफ इंडिया या वृतपत्रात दिनांक १७-०६-२०२१ रोजी मराठी व इंग्रजीत पर्यावरणविषयक जाहीर लोकसूनावणीची सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे प्रस्तावीत प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्टविंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४०००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, लातूर, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, लातूर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर, तहसीलदार, तहसील कार्यालय-देवणी, जिल्हा-लातूर, ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालय-, मौजे आचवला, मौजे तळेगाव (भो.), तालुका-देवणी, जिल्हा- लातूर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, उपप्रादेशिक अधिकारी, उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर व म.प्र.नि., मंडळाच्या संकेतस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध

करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की ,स्थानिक म.प्र.नि.मंडळ, लातूर कार्यालयास तेलंगणा राज्यातून तीन लेखी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री. व्यं. पा. शेळके, समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने श्री. डॉ. संग्राम घुगरे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजने विषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास १२० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. त्यामुळे सदरहु प्रकल्पाचा पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांना केंद्र शासनाची पूर्वपरवानगी लागणार आहे.

सदरहु प्रकल्पास गट नं. 5 चे एन.ए. मंजुरी मिळालीअसुन त्या आधी गट 5 व 6 प्रस्तावित होता पण गट नं 5 मध्येच एकुण क्षेत्र 4.51 हे. आर असुन व त्यात सदरचा हा पुर्ण प्रकल्प गट नं. 5 मधे उभा करता येत असल्यामुळे गट क्र 6 वापरण्याची आवश्यकता नाही.

सादरीकरण पूर्ण झाल्यावर समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या प्रस्तावित नविन ११०.० किलोलिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाबाबत व 3 मे. वॅट वीज प्रकल्पाबाबत त्यांच्या काही सूचना, शंका, टीका टिपणी असल्यास त्या मांडण्याची सूचना केली. तसेच त्यावेळी त्यांनी सांगितले की उपप्रादेशिक कार्यालय, लातूर यांना तेलंगणा राज्यातून तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत, त्याबाबत प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना स्पष्टीकरण करण्याच्या सूचना केली.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प पर्यावारण सल्लागार/ यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे-

१) श्री. बालाजी बाबूराव बोबडे, राहणार-अचवला, तालुका-देवणी, जिल्हा-लातूरः-

हा प्रकल्प उभारला जातो आहे, तो चांगला आहे हे आपण सांगत आहात, त्याप्रमाणे निश्चित आहे. आम्ही सर्व सामान्यमाणसे, खेड्यापाड्यात राहणारे माणसे आहोत. आमच्या कडे लहान मुले, वृध्द व्यक्ती, पशू पक्षी हे खेड्यापाडयात बरेच असतात. पण हा प्रकल्प निर्मिती केल्यामुळे या परिसरातील लोकांना प्रदूषणाचा काही त्रास होणार नाही का? किंवा जे वयोवृध्द लोक असतील, लहान बालके असतील, यांच्या वर काही परिणाम होईलका? अशी माझी एक शंका आहे. तरी माननीय पर्यावरण समितीने माझ्या शंकेचे निरसन करावे, ही विनंती.

यावेळी डॉ. पी.एम. जोशी, प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना प्रथम सर्व प्रश्न ऐकून नंतर एकत्रीत उत्तरे देण्याची सूचना केली.

२) प्राध्यापक भगवान अमृतराव गायकवाड, राहणार- मुक्कामपोस्ट- तळेगांव (भो.), तालुका-देवणी, जिल्हा-लातूरः-

सदरील प्रकल्पामुळे ऊसाला चांगला भाव मिळेल काय?

३) श्री.वाघमारे सत्यनारायण शंकरराव, राहणार- तळेगांव(भो.), तालुका- देवणी, जिल्हा-लातूरः-

हा जो प्रकल्पआहे, याप्रकल्पाला साधारण प्रति दिन किती पाणी लागेल?

४) श्री. सोनू डगवाले, राहणार-धनेगांव, तालुका- देवणी, जिल्हा- लातूरः-

आसवणी प्रकल्पाची उभारणी करत आहात. ही सर्व प्रक्रिया ऊसावर अवलंबून आहे. तर आसवणी प्रकल्पामुळे भविष्यात साखर उद्योगावर काही परिणाम होईल का? अल्कोहोल निर्मिती साठीसाखरेची निर्मिती कमी होईल काय? जर कारखान्याला

साखरेसाठी २,५०० सर्वोच्च भाव दिला जातो, तर प्रस्तावित आसवणी प्रकल्पातून मिळणारा फायदा मोबदला म्हणून ऊस उत्पादकांना देण्यात येईल काय?

५) श्री. लक्ष्मण दौलतराव धनेगावे,राहणार- तळेगांव(भो.),तालुका-देवणी, जिल्हा- लातूरः-

हा प्रकल्प कायमस्वरुपी टिकेल का काही दिवस चालून बंद पडेल?

६) श्री. मालबा रामराव घोनसे, राहणार- तळेगांव(भो.), तालुका-देवणी, जिल्हा- लातूरः-

हा प्रकल्प झाल्यानंतर प्रकल्पातून जे बारीक बारीक कण बाहेर पडतात, धुर बाहेर पडतो, त्यामुळे आजू बाजूचा परिसर तळेगाव **(भो.)**, दरेवाडी येथील नागरिकांवर धुरामुळे आरोग्यावर काही परिणाम होईल काय? तरी हवा प्रदूषणाबाबत उत्तर.

७) श्री. राजेन्द्र व्यंकटराव हल्लाळे, राहणार- आचवला, तालुका- देवणी, जिल्हा- लातूरः-

याप्रकल्पाच्यासभोवतालीखेडीआहेतउदा- आचवला, देवणी इ. तर या प्रकल्पाचा सर्वसामान्य शेतक-यांसाठी काही फायदा होईल काय?

८) **श्री. एच. मधुबाबू, अध्यक्ष, रुरल एन्व्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवेअरनेस सोसायटी, मुशीराबाद, हैद्राबादः-**

त्यांनी सांगितले की त्यांनी लेखी पत्र ईमेलव्दारे पाठविलेले आहे. त्यांनी पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रायलयास सदरहूप्रकल्पासाठी मान्यता देण्याची शिफार सकरण्यात यावी.

९) **श्री. सय्यद, स्वयंसेवीसंस्था, हैद्राबादः-**

त्यांनी सांगितले की मी हैद्राबादहून आलेलो आहे. मी सूचना करु इच्छितो की सदरहूप्रकल्पात ५०% नोक-या स्थानिक लोकांना देण्यात याव्यात, जेणे करुन परिसरातील बेरोजगारी दूर होईल. प्रकल्प परिसरातील आचवला, तळेगाव ( **भो.**) या गावात वैदकीय शिबिरे भरविण्यात यावी.

१०) प्राध्यापक नामदेव मुरलीधरराव कारभारी, राहणार- आचवला, तालुका- देवणी, जिल्हा- लातूरः-

प्रस्तावित नविन प्रकल्पात कोणत्या प्रकारचा घनकचरा निर्माण होईल?

११)श्री. विष्णु दत्ताबन ,राहणार- आचवला, तालुका- देवणी, जिल्हा- लातूरः-

तुमचा कारखाना वरच्याबाजूस होतो. त्या बाजूस आचवला गाव आहे. वारे त्या ब्राजूला जात राहते. याचा काही दुष्परिणाम होऊ शकतो काय?

१२)श्री. वाय.चंद्रसेखर रेड्डी, सामाजिक कार्यकर्ता, हैद्राबादः-

त्यांनी सूचना केली की औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा ही विकसित करण्यात यावी. त्याच प्रमाणे घरगुती सांडपाणी नियंत्रणस यंत्रणासुध्दा विकसित करण्यात यावी. त्याच प्रमाणे प्रकल्प बाधित गावात सीएसआर आणि सीईआर निधी खर्च करण्यातयावा. त्याच प्रमाणे प्रदूषण नियंत्रणासाठी हरितपट्टा विकसित करण्यात यावा. प्रकल्पात रोजगाराची संधी देताना स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. प्रकल्पातील लहान मोठी कामे ही स्थानिकांनाच देण्यात यावीत. त्याच प्रमाणे भूगर्भातील पाण्यात सांडपाणी मिसळूनये. हा एग्रोबेस प्रकल्प आहे. तरी पर्यावरण, वने व हवामानबदल विभागास मंजूरीसाठी शिफारस करण्यात यावी. सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंद विण्याचे आवाहन केले.

13.श्री. नरसिंग दत्तू सावळे, राहणार- आचवला, तालुका- देवणी, जिल्हा- लातूरः-

या कारखान्यातील दुषित पाणी कुठे सोडणार? आज परिस्थिती अशी आहे की दोन विहिरी शेतात असूनही घरुन पाणी आणावे लागते. विहिरीतील पाणी प्यायलेतर दोन दिवस आम्हांला उलट्या व हगवण लागते. जनावराला पाणी दिले, तर जनावर सुध्दा पाणी पीत नाही. अजून नविन कारखाना तयार झाला, तर जास्तीत जास्त विहिरी खराब होणार. सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की ऊसाला भाव व स्थानिकांना रोजगाराची संधी ह्या प्रश्नांची उत्तरे प्रकल्प व्यवस्थापक यांनी द्यावीत. तांत्रिक व पर्यावरणाबाबत उत्तरे ही प्रकल्प पर्यावरण

सल्लागार यांनी द्यावीत. पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की, पहिला प्रश्न होता की वृध्द माणसे, लहान मुले व परिसर यांच्या वर कारखान्याचा काही परिणाम होईल काय? उत्तर देताना त्यांनी सांगितले की कोणत्याही प्रकल्पाचा पर्यावरणावर आघात काय होईल यासाठीच पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास करुन अहवाल तयार करायचा असतो. हा अभ्यास करताना हवा, पाणी म्हणजेज मिनीवरील व भूगर्भातील पाणी यासर्वांचाच अभ्यास असतो. सादरीकरणात आलेख दाखविण्यात आलेले आहेत, त्यात मानके व सर्वेक्षणातील पातळी दाखविण्यात आली. १०कि.मी. परिसरातील धुलीकणे हे मानकांपेक्षा कमी पातळीत आढळले. आसवणी प्रकल्प कार्यान्वित होण्या अगोदर चीपातळी दाखविण्यात आलेली आहे. ही कारखाना कार्यान्वित होण्या अगोदरची परिस्थिती (BACK GROUND) आहे. कारखाना कार्यान्वित झाल्यानंतर ही अशीच देखभाल होईल. आसवणी प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर जी परिस्थिती होईल तीही दाखविण्यात आलेली आहे. त्याचाच अभ्यास केला जातो. आसवणी कार्यान्वित झाल्यानंतर ही जी चार महत्वाच्या घटकात वाढ होईल, ती १.० मायक्रोग्रॅम पेक्षाही कमी असणार आहे. त्यामुळे पर्यावरणास कुठलाही मोठा आघात होणार नाही. जरी नदीतील पाणी घेणार असलो, तरी ८८-९०% पाणी मोलॅसिस मध्येकमी प्रमाणात वापरण्यात येते.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सर्वेक्षण सात गावात करण्यात आलेले आहे. त्यांनी संपूर्ण आलेखाची माहिती दिली. हवेच्या दर्जाबाबत माहिती देताना सांगितले की जर मानके १०० मायकोग्रॅम असेल, तर आपण ५० मायकोग्रॅमच आहोत. त्यांनी पुढे सांगितले की पाणी किती लागेल असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की पाण्याच्या आवश्यकतैसाठी कारखान्याने पाटबंधारे विभागास पत्रलिहिले आहे. ते वाचून दाखविण्याची सूचना केली. त्यांनी सांगितले की १८ जानेवारी, २०२१ ला कारखान्याने

पत्र दिले. त्या पत्रात पाणी किती लागेल याचा उल्लेख आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी १९९५ घनमीटर प्रति दिन पाण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले पुढील प्रश्न सांडपाण्याबाबत होता. तर आपण स्पेंटवॉशची पावडर करणार आहोत. ते शेतीसाठी वापरण्यात येईल. सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की भूगर्भातील पाणी खराब होईल काय अशी भिती व्यक्त करण्यात आलेली होती.सदस्ययांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक हे बंद टाकीत स्पेंटवॉश फक्त पाच दिवसांसाठीच ठेवणारआहेत. आरसीसी टाकी लावणार असून एमईई (मल्टीइफेक्टीव्हइव्हॅपरेटर) लावणार आहेत.द्रवरुप स्पेंटवॉशचे पाणी काढून पावडर स्पेंटवॉश मध्ये करणार आहेत.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी पाणी किती लागेल याप्रश्नास उत्तर दिले की प्रकल्पात ८५% पाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. फक्त १५% पाणी लागेल.

आसवणी प्रकल्पा मुळे साखर उद्योगा वर परिणाम होईल का असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. साखरेच्या सिरपवर उत्पादन करणार आहोत, त्यामुळे साखरेचे उत्पादन थोडेसे कमी होईल.ह्याला कारण साखरेचे उत्पादन आणि दर याच्यात तफावत आली.साखरे चे पोते ठेवण्यास गोडाऊनमध्ये जागाच नाही.आता खुल्या पदध्तीने टेंडर आहे.९०० कोटी लिटर्स अल्कोहोल ची गरज असताना देशात फक्त ३५० कोटी लिटर्स अल्कोहोलची निर्मिती होते. त्यामुळे साखरे पेक्षा इथेनॉलची उत्पादन निश्तिच फायदेशीर पडेल.त्यामुळे कारखान्याची आणि पर्यायाने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे. पुढील प्रश्न आसवणी प्रकल्प किती दिवस चालेल असा होता. तर साखर कारखाना अंदाजे १८० दिवस चालतो, तर आसवणी प्रकल्प हा ३३० दिवस चालणार आहे. साखर कारखाना चालू असताना ऊसाच्या रसापासून आणि कारखाना चालू नसताना मोलॅसिसपासून आसवणी प्रकल्प चालू राहणार आहे.

पुढचा प्रश्न् होता हवा प्रदूषणाबाबत. त्याचे उत्तर दिलेले आहे. नंतर श्री मधुबाबू व इतर यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, तर त्यांचे म्हणणे आहे की रोजगारात स्थानिकांना प्राधान्य आणि सामाजीक कामांबद्द्ल आहे. उदा-हरितपट्टाविकास, स्थानिक युवकांना कौशल्य प्रशिक्षण. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात याचा उल्लेख केलेलाच आहे. पुढील प्रश्न प्रकल्पात निर्माण होणा-या घन कच-याबाबत होता. घातक घन कचरा व घनकचरायाबाबत माहिती हवी होती. प्रकल्पात कोळसा वापरला जाणार नाही. तर बगॅसेचे बॉयलर कार्यरत आहेत. बगॅसची राख आणि यीस्टस्लज तयार होणार आहे.

नंतर प्रश्न होता हवेच्या दिशेच्याबद्दल. यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वा-याची दिशा ही वर्षात तीन वेळा बदलते. वा-याची दिशा फिरत असते. प्रकल्पात ईएसपी ही अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे व ७० मीटर्स उंचीची चिमणी बसविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. आतमध्ये जे काही सर्वेक्षण होते, त्याचा डिजीटल बोर्ड बाहेर लावण्यात येतो. ऑनलाईनमुळे म.प्र.नि.मंडळ आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला तो जोडलेला असतो. आम्ही एका दिवसाचे रिझल्ट्स दाखवितो.

औद्योगिक व घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेबाबत सर्व मुद्दे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंदविण्यात आलेले आहेत. जगातील सर्वात मोठी असणारी जपानची दाईकी एक्सीस कंपनीचा एसटीपी कार्यरत करण्यात येणार आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की शेवटचा प्रश्न होता तो विहिरीच्या प्रदूषणाचा. त्यांनी सांगितले की ही जनसुनावणी झाल्यानंतर त्या विहिरीचे लोकेशन सांगण्यात यावे. यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी

नमुना घेण्याची सूचना केली. तेथे पाण्याचे नमुने घेण्यात येतील. ते तीन वेगवेगळ्या प्रयोगशाळेला पाठविण्यात येईल.

आपण प्रश्नाच्या मुळाशी जाऊ. आक्षेप नोंदविल्याप्रमाणे सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी गावातील आरोग्य सद्यस्थिती तपासण्याची सूचना केली. सदस्ययांनी उपस्थित केलेल्या प्रश्नास - विहिर प्रदूषण उत्तर पाठविण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे लेखी सूचना मिळाल्यानुसार आणि श्री. मधुबाबू यांनी जरी सूचविले असले तरी त्या अगोदर चरेनवॉटर हार्व्हेस्टींग प्रकल्प कार्यान्वित आहे.

श्री. सु. दि. देशमुख, प्रकल्प व्यवस्थापक यांनी दोन प्रश्नाना उत्तर दिले. प्रकल्प व्यवस्थापक यांनी सांगितले की प्रश्न विचारण्यात आलेला आहे की, सभासदाना आसवणी प्रकल्पामुळे काय फायदा होणार आहे? त्यांनी उत्तर दिले की जसा कारखान्याचा दर वाढणार, वाढून नफा होईल, त्याचप्रमाणे ऊसाला जादा भाव देता येईल. दुसरा प्रश्न रोजगाराबाबत. तर स्थानिकांना जर कायमचे समाविष्ट करणे शक्य असेल तर आमचा १००% तसा प्रयत्न आहे.

श्री. विजयकुमार ढगे, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, लातुर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी यांनी सुनावणीचा समारोप करताना असे सांगितले की आज आपण **मेसर्स.जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, तळेगाव (भो.)**, तालुका-देवणी, जिल्हा-लातूर यांच्या प्रस्तावित नविन ११० किलोलिटर प्रतिदिन मळी (बी आणि सी हेवी) / ऊसावर आधारित आसवणी प्रकल्प व 3 मे. वॅट वीज प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीसाठी एकत्र आलेलो आहोत. येथे सर्व उपस्थितांनी सहभाग घेतला. प्रकल्पाचे सादरीकरण झालेले आहे. ब-याच विषंयावर पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिलेले आहे. सर्वानाच टीका, टिप्पणी सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधी देण्यात आली. त्यास पर्यावरण सल्लागार व

कारखाना व्यवस्थापनाकडून समाधानकारक उत्तरे मिळाली असा माझा समज आहे.

बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून बैठकीचे इतिवृत करण्यात येईल व पुढे ते शासनास सादर करण्यात येईल. तरी सर्वांचे आभार मानून लोकसुनावणी संपन्न झाल्याचे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी घोषित केले. माननीय अध्यक्षांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी संस्थिगत करण्यात आली.

सोबत म.प्र.नि. मंडळ कार्यालयास आणि बैठकीत सादर करण्यात आलेली निवदने व आक्षेप जोडण्यात आलेले आहेत.

(डॉ. पी. एम. जोशी),
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समितीतथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ,
औरंगाबाद

(विजयकुमार ढगे),
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, लातूर,
जिल्हा-लातूर

Collector Office
LATUR.

(व्ही. पी. शेळके),
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती तथा
उपप्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ,लातूर,